महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi.dhepune@nic.in
फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.

क्र.: उशिसं/स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव/मवि-१/२०२२/ 9961 दिनांक: ७.२०२२ 25 JUL 2022

## परिपत्रक

**विषय: " स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव " अंतर्गत " घरोघरी तिरंगा " हा उपक्रम दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राबविण्याबाबत.**

**वाचा** : १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण ८२२२/ प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४ दि. २० जून २०२२

२. शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.८२/आस्था-२, दि.-२२ जुलै, २०२२

३. संचालनालयाचे समक्रमांकाचे परिपत्रक दि. १९ जुलै, २०२२

" स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव " अंतर्गत केंद्र सरकारच्या सूचनांनुसार " हर घर तिरंगा " हा उपक्रम राबविण्याबाबतच्या सविस्तर सूचना उपरोक्त वाचा क्र. १ मध्ये देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरून उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत शासकीय/निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, निवासस्थाने इ. इमारतींवर " हर घर तिरंगा " या उपक्रमांतर्गत राष्ट्रध्वज फडकविण्यासंदर्भात वाचा क्र.२ मध्ये सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार हर घर तिरंगा (घरोघरी तिरंगा) हा उपक्रम दि.१३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राबविण्यात यावा. सदर उपक्रमांतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत शासकीय/निमशासकीय कार्यालये, सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, वसतिगृहे, निवासस्थाने इ. इमारतींवर राष्ट्रध्वज फडकविला जाईल याची संबंधित अधिकाऱ्यांनी खातरजमा करावी. सदर उपक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये समाविष्ट करावयाच्या बाबी वाचा क्र. २ मध्ये सविस्तर नमूद करण्यात आल्या आहेत. (प्रत संलग्नीत) त्यानुसार कार्यवाही बाबत दक्षता घेण्यात यावी.

सदर उपक्रमाबाबत सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण तसेच कुलसचिव सर्व अकृषी विद्यापीठे यांच्यास्तरावरून सर्व संलग्नित महाविद्यालयांना योग्य त्या सुचना देण्यात याव्यात. सदर राष्ट्राभिमानी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाविद्यालयीन स्तरावरील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक इत्यादी सर्व घटकांचे सहकार्य अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाविद्यालयांनी विभागीय सहसंचालक कार्यालयास व विभागीय सहसंचालक कार्यालयांनी महाविद्यालयांचा एकत्रित अहवाल तसेच सहसंचालक कार्यालयाचा अहवाल या संचालनालयास सादर करावा. तसेच कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे यांनी विद्यापीठ आस्थापनेचा अहवाल सादर करावा.

(डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रत माहितीस्तव सविनय सादर,

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

कृ.आ.प.

प्रत उचित कार्यवाहीस्तव,

१. कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्रशा-३ कार्यासन, प्रस्तुत संचालनालय.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

३. प्राचार्य/कुलसचिव, सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये/सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे,स्वयंअर्थ सहाय्यित विद्यापीठे/ समूह विद्यापीठे - महाराष्ट्र राज्य.

“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” अंतर्गत
**“हर घर झंडा”उपक्रम राबविण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**

**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० जून, २०२२

**वाचा :-** १) केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाचे सादरीकरण दिनांक १२ एप्रिल, २०२२ व दिनांक २० मे, २०२२
२) भारतीय ध्वज संहिता २००५

**प्रस्तावना :-**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनात या स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक/ क्रांतिकारक/ स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात रहावी, या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी “आजादी का अमृत महोत्सव” अर्थात “स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

२. केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाने “हर घर झंडा” या विषयावरील दि.१२.०४.२०२२ व दि. २०.०५.२०२२ च्या दोन स्वतंत्र सादरीकरणांद्वारे या कार्यक्रमाच्या आयोजनाच्या अनुषंगाने विविध निर्देश दिलेले आहेत. त्यामध्ये, (१) या उपक्रमांतर्गत सर्व शासकीय/ निमशासकीय/ खाजगी आस्थापना /सहकारी संस्था/ शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या इमारतींवर व नागरिकांनी स्वत:च्या घरावर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फूर्तीने करण्यासाठी सकारात्मक प्रभावी प्रसिद्धी मोहिम राबविण्यात यावी. (२) याबाबत सुक्ष्म नियोजनबद्ध कार्यक्रम आखण्यात येऊन उपरोक्त कालावधीत सदर उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात यावा. (३) या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व शासकीय/ निमशासकीय यंत्रणांनी प्रसार माध्यमातून जाणीव-जागृतीची मोहिम प्रभावीपणे राबवावी. (४) स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्रे, स्वस्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्व सामान्य नागरिकांशी निगडीत यंत्रणांचा वापर करुन सदर कार्यक्रम यशस्वी करावा, अशा सूचनांचा समावेश आहे. केंद्र शासनाच्या “हर घर झंडा” उपक्रम राबविण्याबाबतच्या दि. १२.०४.२०२२ च्या सादरीकरणांची प्रत सर्व मंत्रालयीन विभाग तसेच जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आली आहे. तसेच, दि.२०.०५.२०२२ च्या सादरीकरणाची प्रत सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आयुक्त, महानगरपालिका यांना यापूर्वीच पाठविण्यात आली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या सदरच्या मार्गदर्शक सूचना सर्व विभागांच्या पुनश्च: निदर्शनास आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या गौरवशाली पर्वानिमित्त दिनांक १२ मार्च, २०२१ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत "आजादी का अमृत महोत्सव" या उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाने कळविले आहे. त्यानुसार राज्यात सदर कालावधीमध्ये "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" साजरा करण्याबाबत शासन निर्णय/शासन पत्रांद्वारे यापूर्वीच वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाने जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायम स्वरुपी मनात राहावी व त्याचे संस्मरण व्हावे या उद्देशाने "आजादी का अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये देशभरात "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना एकत्रितरित्या खालीलप्रमाणे पुन्हा उद्धृत करण्यात येत आहेत :-

१) सर्व शासकीय / निमशासकीय यंत्रणांनी प्रसार माध्यमातून देशाभिमान व जाणीव-जागृतीची मोहिम प्रभावीपणे राबवावी.

२) दिनांक ११ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत प्रत्येक शासकीय/निमशासकीय व खाजगी आस्थापनांवर तसेच, प्रत्येक घर व इमारतींवर राष्ट्रध्वज उभारणेसाठी नागरीकांना प्रोत्साहीत करावे.

३) नागरिकांनी राष्ट्रध्वज स्वत: विकत घेऊन उभारण्यासाठी त्यांना प्रेरीत करावे.

४) सदर राष्ट्रध्वज उभारणीसाठी जास्तीत जास्त प्रसिद्धी करावी. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करण्यात यावा.

५) केंद्रिय गृह विभाग यांच्या दिनांक ३० डिसेंबर २०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये भारतीय ध्वज संहिता २००२ भाग-१ मधील परिच्छेद १.२ मधील राष्ट्रध्वज हे "**हाताने कातलेल्या किंवा विणलेल्या** लोकर/सुत/सिल्क/खादी कापडापासून बनविलेला असेल", या तरतूदीमध्ये बदल करण्यात आला असून सदर बदलानुसार राष्ट्रध्वज हे हाताने कातलेल्या आणि हाताने विणलेल्या **किंवा मशीनद्वारे** तयार केलेल्या सुत / **पॉलिस्टर/** लोकर/ सिल्क/खादी पासून बनविलेल्या कापडाचे असावेत असा उल्लेख केला आहे. या बदललेल्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेल्या राष्ट्रध्वजाचा वापर या प्रयोजनासाठी करता येईल.

६) संगीतातूनही राष्ट्रध्वजाबाबत वेगवेगळ्या पद्धतीने सादरीकरण करता येईल.

७) "हर घर झंडा" या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी करावी.

८) या उपक्रमामध्ये राज्य / देशातील / परदेशातील सहभागी होणाऱ्या व्यक्तींची नोंद घ्यावी.

९) राष्ट्रध्वज मुबलक उपलब्ध होणेबाबत खात्री संबंधित यंत्रणांनी करावी.

१०) ऑनलाईन व ऑफलाईन राष्ट्रध्वज विक्री केंद्र राज्याने उपलब्ध करुन द्यावे

११) भारतीय ध्वज संहितेचे पालन व्हावे व जाणते-अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अपमान होऊ नये, याची दक्षता घेण्याबाबत नागरिकांमध्ये जाणीव-जागृती करावी.

१२) "हर घर झंडा" या उपक्रमांतर्गत कार्यक्रमाची छायाचित्रे, चित्रफिती, ध्वनीमुद्रण इ. केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाच्या amritmahotsav.nic.in या संकेत स्थळावर अपलोड करावे.

१३) नागरिकांमध्ये या उपक्रमाबाबत रुची निर्माण करण्यासाठी वेबसाईट, ई-कॉमर्स तसेच राष्ट्रध्वज भेट देणे अशा माध्यमांचा आधार घेण्यात यावा.

१४) स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्रे, स्वस्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्व सामान्य नागरीकांशी निगडीत यंत्रणांचा वापर करुन सदर कार्यक्रम यशस्वी करण्यात यावा. याबाबतचा मार्गदर्शक कृती आराखडा सोबत परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविण्यात आला आहे.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२२०६२०१८१९२१८२२३ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**सोबत - परिशिष्ट - अ**

VILAS RAMRAO THORAT

Digitally signed by VILAS RAMRAO THORAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b747ae11457103a0cfb9a57fc6ce6, pseudonym=2908C178C06A08E995849046F8BCFB7325B57851, serialNumber=CB03C92B399CC89310BF1378C184D97A4B7B9B98E926EA8E71DD7BC9CB273631, cn=VILAS RAMRAO THORAT
Date: 2022.06.21 15:13:22 +05'30'

**( विलास रा. थोरात )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) / मा. राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व पोलीस आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११. सर्व आयुक्त, महानगर पालिका
१२. सर्व मुख्य अधिकारी, नगर पालिका / नगर पंचायत
१३. सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी
१४. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखाली सर्व क्षेत्रिय अधिकारी
१५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१६. निवड नस्ती, सां.का.४.

**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४**

**“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” अंतर्गत “हर घर झंडा”उपक्रम राबविण्याबाबत**

## परिशिष्ट – अ

### (अ) कृती आराखडा : ग्राम पंचायती

- सर्व ग्राम पंचायती - ग्रामीण प्रसारासाठी महत्वपूर्ण माध्यम
- संबंधित विभागांच्या स्तरावर आवश्यक असलेल्या ग्राम पंचायतींच्या प्रमुखांबरोबर संपर्क सत्रे / चर्चासत्रे यांचे आयोजन करावे.
- प्रत्येक गावात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करावी.
- बचत गटांचा सहभाग स्थानिक : शिलाई काम करणाऱ्या गटांद्वारे ध्वजांची शिलाई / निर्मिती करता येईल.
- विक्री / वितरण केंद्र म्हणून ग्रामपंचायत कार्यालयांचा उपयोग करुन घ्यावा.
- ग्राम पंचायतींद्वारे ध्वजांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करता येईल. सदर खरेदी स्थानिक घरांच्या संख्येवर आधारीत असावी.
- सर्व शासकीय इमारती / संस्थांवर ध्वजारोहण करावे.
- स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे.

### (आ) कृती आराखडा : आरोग्य केंद्रे, रुग्णालये + ANM

- आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामुदायिक आरोग्य केंद्रे, उपविभागीय रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा या उपक्रमात महत्वपूर्ण सहभाग अपेक्षित आहे.
- संदेश वहन साहित्य - प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इ. स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत.
- प्रसुतिगृहातील सहाय्यक परिचारिकांना तिरंग्याची माहिती असलेल्या पुस्तिका (फ्लिप बुक्स) यांचे वाटप करावे.
- लहान मुलांना रंग देण्यासाठी छापील आकृत्या, छापील कागद (कटआउट्स, प्रिंटआउट्स) उपलब्ध करुन द्यावेत.
- रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षामध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे, आजादी का अमृत महोत्सव इ. बाबतचे चित्रपट दाखवावेत.

### (इ) कृती आराखडा : रास्त भाव धान्य दुकाने (वाजवी किंमतीची दुकाने)

- रास्त भाव दुकाने :- ध्वज वितरण विक्री केंद्र म्हणून काम पाहावे.
- या दुकानांमध्ये आणि त्याच्या सभोवताली पूर्व ध्वनीमुद्रित संदेश, सांगितिक जाहिराती (जिंगल), राष्ट्रध्वजावरील माहिती माईकवर प्रसारित करावी.

**(ई) कृती आराखडा: शाळा आणि महाविद्यालये**

- शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्यामार्फत जाणीव-जागृती करणे. सदर योजनेचा प्रचार, प्रसार करण्यासाठी या माध्यमाचा वापर करावा.
- राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने / शिबीरे / चर्चासत्र इ. चे आयोजन करावे.
- #hargharjhanda या हॅशटॅगखाली समाज माध्यमांवर छायाचित्रे प्रसारित करावीत. राज्य/जिल्हा/शाळेचा उल्लेख करुन सोशल मीडियावर फोटो शेअर करावेत.
- पालकांचा सहभाग :- सर्व पालकांना सहभागी होण्यासाठी विशेष दैनंदिन सूचना पत्रे, पत्रके वितरीत करावीत.
- पालक शिक्षक सभा :- हर घर झंडा विषयी माहिती देण्यासाठी पालक शिक्षक सभांचे आयोजन करावे.

**(उ) कृती आराखडा : पोलीस**

- पोलीस महासंचालकांद्वारे हर घर झंडा या कार्यक्रमाबाबत विशेष बैठकांचे आयोजन करावे.
- विशेष तिरंगा मानवंदना संचलने आयोजित करावीत.
- हर घर झंडा या कार्यक्रमाविषयी प्रचार, प्रसार व जागरुकतेसाठी प्रचार साहित्य, पत्रिका व इतर साहित्य वितरीत करावे.
- पथनाट्यांद्वारे तिरंग्याची आण-बाण-शान या संकल्पनेचा प्रसार करण्यात यावा.
- पोलिस स्टेशन परिसरात - फलक, प्रसिध्दीपत्रके, उभे फलक (स्टँडी) लावणे व ध्वजारोहण करणे.
- पोलिस वसाहतींमध्ये राष्ट्रध्वजाची विक्री व वितरण केंद्रे निर्माण करण्याची विशेष मोहीम घ्यावी.
- सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वसाहतींमध्ये /घरी ध्वजारोहण करावे.
- प्रत्येक पोलीस तपासणी नाक्यावर तिरंगा ध्वजाची प्रसिध्दीपत्रके लावावी.

**(ऊ) कृती आराखडा : परिवहन सुविधा**

- राज्य परिवहनच्या बसेस “हर घर झंडा” याच्या संदेशाने रंगविल्या जाव्यात.
- पथकर व तपासणी नाके यांचे माध्यमातून हर घर झंडा या कार्यक्रमाचा प्रचार, प्रसार व जागरुकता निमार्ण करण्यासाठी माहिती पुस्तिका, प्रसिध्दी पत्रके इ. वितरित करणे.
- अंतरसंपर्क (इंटरकॉम) आणि ध्वनीचित्रमुद्रण (व्हिडिओ) प्रणालीद्वारे राज्यांतर्गत प्रवासी बसेसमध्ये - सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित ध्वजगीत वाजविणे, ध्वज संबंधित चित्रफित दाखविणे.

**(ए) कृती आराखडा : - प्रसार माध्यमे संकेतस्थळ, भिंतीचित्रे इ.**

- सर्व राज्य सरकारच्या संकेतस्थळांवर अमृत महोत्सव संकेतस्थळ (amritmahotsav.nic.in) हर घर झंड्याचा दुवा जोडावा.
- राज्य आणि जिल्हा स्तरावरील कृती आराखड्याबद्दल प्रसार माध्यमांना विशेष माहिती देणे. याअंतर्गत -
- १ जूनपासून दररोज विशेष बातमीपत्र सुरु करण्यासाठी दुरदर्शनचा, आकाशवाणीचा वापर करावा.
- स्थानिक प्रसिध्दी अधिकाऱ्यांनी सर्व कार्यक्रमांचे योग्य वार्तांकन करावे व त्यावर प्रकाशझोत टाकावा.
- ध्वज निर्मिती, वितरण, देशभक्ती यांच्याशी संबंधित असलेल्या स्वारस्यपूर्ण कथा निर्माण कराव्यात.
- सर्व सार्वजनिक बदलीच्या ठिकाणी भिंतीचित्रे (वॉल पेंटिंग्ज) निर्माण करावीत.

**(ऐ) कृती आराखडा : महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत**

- सर्व महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत - नागरी भागातील प्रसारासाठी महत्वपूर्ण माध्यम
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत यांच्या प्रशासकीय प्रमुखांनी संबंधित वॉर्डच्या अधिकाऱ्यांसमवेत समन्वय करुन संपर्क सत्रे / चर्चासत्रे याचे आयोजन करावे.
- प्रत्येक वॉर्डात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करावी.
- बचत गटांचा सहभाग : स्थानिक शिलाई काम करणाऱ्या गटांद्वारे ध्वजांची शिलाई / निर्मिती करता येईल.
- विक्री / वितरण केंद्र म्हणून महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत कार्यालयांचा उपयोग करुन घ्यावा.
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत या आस्थापनांना ध्वजांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करता येईल. सदर खरेदी स्थानिक घरांच्या संख्येवर आधारीत असावी.
- सर्व प्रशासकीय इमारती / संस्थांवर ध्वजारोहण करावे.
- स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे.
- संदेश वहन साहित्य - प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इ. स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत.
- महानगर पालिका / नगरपालिकांच्या रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षांमध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे, आजादी का अमृत महोत्सव इ. बाबतचे चित्रपट दाखवावेत.
- राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने / शिबीरे / चर्चासत्र इ. चे आयोजन करावे.
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत वसाहतींमध्ये राष्ट्रध्वजाची विक्री व वितरण केंद्रे निर्माण करण्याची विशेष मोहीम घ्यावी.

- जाहिरात फलक, बॅनर, फ्लिप बुक्स, सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित इ. चे नमुने

**(ओ) केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून खालील स्वरुपाचे सहाय्य उपलब्ध केले जाईल.**

- आजादी का अमृत महोत्सव (amritmahotsav.nic.in) या संकेतस्थळावर हर घर झंडा कॉर्नर
- अनुवाद करण्यासाठी व प्रसार व प्रचार करण्यासाठी पुरविलेली माहिती व संप्रेक्षण साहित्य डाऊनलोड कराव्यात.
- जाहिरात फलक, बॅनर, फ्लिप बुक्स, सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित इ. चे नमुने
- ध्वजगीत व ध्वनिचित्रफित पुरविणे.

*-*-*-*-*-*-*

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

**Web :** www.dhepune .gov. in **E-Mail :mavi.**dhepune@nic.in

फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.

क्र.: उशिसं/स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव/मवि-१/२०२२/ ००८६० दिनांक: .७.२०२२

19 JUL 2022

## परिपत्रक

**विषय: आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत " स्वराज्य महोत्सव " व " हर घर तिरंगा " या उपक्रमांच्या यशस्वी आयोजनाबाबत.**

**वाचा :** १. शासनपत्र क्र.: संकीर्ण-२०२२/प्र.क्र.८२/आस्था-२ दि. २८ जून २०२२
२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण ८२२२/ प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४ दि. २० जून २०२२
३. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण ८२२२/ प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.-४ दि. ३० जून २०२२
४. अ.शा.प.क्र.संकीर्ण-८८२२/ प्र.क्र. १६१/ सां.का.४, दि.१३.०७.२०२२
५. शासनपत्र क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.८२/ आस्था-२ दि.१४.०७.२०२२

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, दि. १२ मार्च, २०२१ ते १५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत "आजादी का अमृत महोत्सव" या उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाकडून कळविण्यात आले आहे. त्यानुसार राज्यात सदर कालावधीमध्ये "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" साजरा करण्याबाबत यापुर्वी वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने जनतेच्या मनात स्वातंत्र्यलढयाच्या स्मृती तेवत रहाव्यात व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरुपी जनमानसात रहावी या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** अंतर्गत **दि. ११ ऑगस्ट २०२२ ते दि. १७ ऑगस्ट २०२२** या कालावधीमध्ये देशभरात **"हर घर तिरंगा"** हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

**दिनांक ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत "स्वराज्य महोत्सव" हा उपक्रम राबविण्यात येणार असून सदर उपक्रम आयोजित करण्यासाठी पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभागाच्या दि.२०.०६.२०२२ व दि. ३०.०६.२०२२ च्या शासन निर्णयान्वये आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचा तपशील देण्यात आला आहे, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. (प्रत संलग्न)**

**"हर घर तिरंगा" या अभियानांतर्गत नागरिकांनी राष्ट्रध्वजाची खरेदी स्वत: करून, आपल्या घरावर राष्ट्रध्वज फडकवणे यामध्ये अभिप्रेत आहे. या दोन्ही उपक्रमांमध्ये राज्यातील प्रत्येक विभागाने, कार्यालयाने व नागरिकाने यामध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे.**

**"स्वराज्य महोत्सव"** व **"हर घर तिरंगा"** या उपक्रमामध्ये, महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांचा विविध कार्यक्रम/उपक्रमात सहभाग अतिशय महत्त्वाचा राहणार आहे. महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावरील निबंध स्पर्धा, वक्तृत्त्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, तसेच प्रभात फेरी/

पदयात्रा, पथनाटये यामधून विद्यार्थ्यांचा मोठया प्रमाणात सहभाग घेता येऊ शकतो. याशिवाय, विद्यार्थी विरासत योजना, गावच्या इतिहासाचे लेखन आणि सांस्कृतिक कार्यक्रम यामधूनही विद्यार्थी मोठया प्रमाणात भाग घेऊ शकतात आणि स्वराज्य महोत्सवाचा व्यापक हेतू साध्य होऊ शकतो. या दोन्ही अभियानाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सहकार्य घेण्यात यावे. तेव्हा **"स्वराज्य महोत्सव"** व **"हर घर तिरंगा"** या दोन्ही उपक्रमाच्या प्रभावी व यशस्वी अंमलबजावणीसाठी आपल्या स्तरावर नियोजन करण्यात यावे.

उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाविद्यालयांनी विभागीय सहसंचालक कार्यालयास व विभागीय सहसंचालक कार्यालयांनी महाविद्यालयांचा एकत्रित अहवाल तसेच सहसंचालक कार्यालयाचा अहवाल या संचालनालयास सादर करावा. तसेच कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे यांनी विद्यापीठ आस्थापनेचा अहवाल सादर करावा.

सोबत- वरीलप्रमाणे

**(डॉ. प्रकाश बच्छाव )**
शिक्षण सहसंचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रति,

१. कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्रशा-३ कार्यासन, प्रस्तुत संचालनालय.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य/कुलसचिव, सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित/मॉडेल डिग्री महाविद्यालये/सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे,स्वयंअर्थ सहाय्यित विद्यापीठे/ समूह विद्यापीठे - महाराष्ट्र राज्य.
४. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र. ८२/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक१४ जुले, २०२२.

प्रति,

१. संचालक,
उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण / कला शिक्षण/ग्रंथालय
महाराष्ट्र राज्य, पुणे, मुंबई.

२. सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापीठे/ अभिमत विद्यापीठे/
स्वयंअर्थ सहाय्यित विद्यापीठे/ समूह विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

३. राज्य समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना.

विषय:- आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत "स्वराज्य महोत्सव" व " हर घर तिरंगा"
या उपक्रमांच्या यशस्वी आयोजनाबाबत.

संदर्भ :- अ.शा. प्र. क्र. संकीर्ण-८८२२/प्र.क्र. १६१/सां.का. ४, दि. १३/०७/२०२२
रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भीय पत्र यासोबत पाठविण्यात येत आहे. दिनांक ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत स्वराज्य महोत्सव हा उपक्रम राबविण्यात येणार असून सदर उपक्रम आयोजित करण्यासाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि. ३०/०६/२०२२ च्या शासन निर्णयान्वये आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचा तपशील कळविण्यात आला आहे. तसेच दि. ११ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत "हर घर तिरंगा" हा उपक्रम संपूर्ण देशभर साजरा करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत नागरिकांनी राष्ट्रध्वजाची खरेदी स्वत: करुन, आपल्या घरावर राष्ट्रध्वज फडकवणे यामध्ये अभिप्रेत आहे. या दोन्ही उपक्रमांमध्ये राज्यातील प्रत्येक विभागाने, कार्यालयाने व नागरिकाने यामध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे.

"स्वराज्य महोत्सव" व "हर घर तिरंगा" या उपक्रमामध्ये, महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांचा विविध कार्यक्रम/उपक्रमात सहभाग अतिशय महत्वाचा राहणार आहे. महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावरील निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, तसेच प्रभात फेरी/पदयात्रा, पथनाट्ये यामधून विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग घेता येऊ शकतो, याशिवाय, विद्यार्थी विरासत योजना, गावच्या इतिहासाचे लेखन आणि सांस्कृतिक कार्यक्रम यामधूनही या विद्यार्थी मोठ्या प्रमाणात भाग घेऊ शकतात आणि स्वराज्य

महोत्सवाचा व्यापक हेतू साध्य होऊ शकतो. या दोन्ही अभियानांच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सहकार्य घेण्यात यावे. तेव्हा "स्वराज्य महोत्सव" व "हर घर तिरंगा" या दोन्ही उपक्रमाच्या प्रभावी व यशस्वी अंमलबजावणीसाठी आपल्या स्तरावर नियोजन करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(अजित बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

सौरभ विजय, भा.प्र.से.

सचिव

अ.शा.प.क्रमांक : संकीर्ण-८२२२/प्र.क्र.१६१/सां.का.४

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
९ वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१.

दिनांक :-१३ जुलै, २०२२

आदरणीय महोदय,

**"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** हा उपक्रम देशाभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यातही विविध उपक्रमांचे / कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. दिनांक ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत **"स्वराज्य महोत्सव"** हा उपक्रम राज्यपातळी ते ग्राम / वॉर्ड पातळीपर्यंत आयोजित करण्यासाठी, दिनांक ३० जून, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. स्वराज्य महोत्सवामध्ये वार्ड पातळीवरुन आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचा तपशील शासन निर्णयात नमूद आहे.

दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत देशभरात **"हर घर तिरंगा"** हा उपक्रम सर्व स्तरावरुन राबविण्यात येणार आहे. हर घर तिरंगा या उपक्रमासाठी आवश्यक सूचना दिनांक २० जून, २०२२ व दिनांक ३० जून, २०२२ रोजीच्या शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या आहेत. तसेच, नगर विकास विभागाने सुद्धा दिनांक ०७ जुलै, २०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये हा उपक्रम राबविण्याबाबत स्वतंत्र सूचना निर्गमित केलेल्या आहेत व ग्रामविकास विभागाने सुद्धा हर घर तिरंगा हा उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दि. ६ जुलैच्या पत्राद्वारे सर्व संबंधितांना मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

दिनांक ११ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट या कालावधीत "हर घर तिरंगा हा उपक्रम संपूर्ण देशभर साजरा करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत नागरिकांनी राष्ट्रध्वजाची खरेदी स्वत: करुन, आपल्या घरावर राष्ट्रध्वज फडकवणे यामध्ये अभिप्रेत आहे. या दोन्ही उपक्रमांमध्ये राज्यातील प्रत्येक विभागाने, कार्यालयाने व नागरिकाने यामध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे.

तातडीने सूचना द्यावे. 14/7 श्री कार्यक्रम

उच्च व तंत्र शिक्षण विभाग हा शासनाचा अतिशय महत्त्वाचा विभाग असल्याने या विभागाचा सदर उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग आवश्यक आहे. स्वराज्य महोत्सवा दरम्यान, महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांचा विविध कार्यक्रम / उपक्रमात सहभाग अतिशय महत्त्वाचा राहणार आहे. महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावरील निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, तसेच प्रभात फेरी / पदयात्रा, पथनाट्ये यामधून विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग घेता येऊ शकतो. याशिवाय, विद्यार्थी विरासत योजना, गावच्या इतिहासाचे लेखन आणि सांस्कृतिक कार्यक्रम

...२/-

यामधूनही या विद्यार्थी मोठ्या प्रमाणात भाग घेऊ शकतात आणि स्वराज्य महोत्सवाचा व्यापक हेतू साध्य होऊ शकतो. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सहकार्य मोठ्या प्रमाणात अपेक्षित आहे. या विद्यार्थ्यांना "हर घर तिरंगा विषयी महत्त्व पटवून देऊन, त्यांच्याकरवी पालकांना व समाजातील इतर घटकांना उद्युक्त करता येऊ शकते. **"आजादी का अमृत महोत्सव"** अंतर्गत **"स्वराज्य महोत्सव"** व **"हर घर तिरंगा"** या उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा सहभाग मोठ्या प्रमाणात मिळाल्यास, हे दोन्ही उपक्रम यशस्वीपणे साजरा करता येऊ शकतील, असा विश्वास आहे. तरी, आपल्या स्तरावरून याबाबत सर्व संबंधिताना योग्य ते आदेश निर्गमित करण्यात यावेत.

**"स्वराज्य महोत्सव"** व **"हर घर तिरंगा"** या दोन्ही उपक्रमाच्या प्रभावी व यशस्वी अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण सहभाग व सहकार्य व्हावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

(सौरभ विजय)

**प्रति,**

**श्री.विकासचंद्र रस्तोगी, भा.प्र.से.**
**प्रधान सचिव,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत
"हर घर झंडा"हा उपक्रम "हर घर तिरंगा"
म्हणून राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ३० जून, २०२२

वाचा :- १) केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाचे अ.शा. पत्र क्र. ४२२२/ ११९/२०२२/अकाम, दिनांक २३ मे, २०२२
२) शासन परिपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग सम क्रमांक दिनांक २० जून, २०२२

**शासन परिपत्रक :-**

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्याबाबतच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना उपर्निर्दिष्ट क्र. २ च्या शासन परिपत्रकान्वये एकत्रितरित्या प्रसृत करण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या उपर्निर्दिष्ट क्र. १ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये "आजादी का अमृत महोत्सव" अंतर्गत **"हर घर तिरंगा"** हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे कळविले आहे.

२. केंद्र शासनाने सदर उपक्रमाच्या नावात केलेला बदल विचारात घेता "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर झंडा" हा उपक्रम राज्यात आता **"हर घर तिरंगा"** या नावाने राबविण्यात यावा. तसेच ज्या-ज्या ठिकाणी "हर घर झंडा" उपक्रम असा उल्लेख असेल, त्या ठिकाणी "हर घर तिरंगा" उपक्रम असे संबोधण्यात यावा.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक **२०२२०६३०१५३९१३९५२३** असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

VILAS RAMRAO THORAT

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) / मा. राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व पोलीस आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११. सर्व आयुक्त, महानगर पालिका
१२. सर्व मुख्य अधिकारी, नगर पालिका / नगर पंचायत
१३. सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी
१४. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखाली सर्व क्षेत्रिय अधिकारी
१५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१६. निवड नस्ती, सां.का.४

महाराष्ट्र शासन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Email: do.asthahte-mh@gov.in

क्र:संकीर्ण-२०२२/प्र.क्र.८२/आस्था-२
४३१ विस्तार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२
दिनांक: २८ जून, २०२२.

प्रति,

१) संचालक (उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण/कला/ग्रंथालय)
संचालनालय, पुणे/मुंबई

२) सर्व कुलसचिव (विद्यापीठे),
महाराष्ट्र राज्य.

विषय : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव.
"हर घर झंडा"
संदर्भ: क्र.संकीर्ण-८२२२/प्रक.१८९/सां.का.-४, दिनांक २३.०६.२०२२
रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचे सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे संदर्भीय पत्र व सोबतच्या परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या घरावर तसेच सर्व शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापना/सहकारी संस्था यांच्या कार्यालयावर राष्ट्रध्वजाची उभारणी करण्याबाबतचा उपक्रम यशस्वीपणे पार पडेल यासंदर्भात नियोजन करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास दिनांक ०५.०७.२०२२ पर्यंत सादर करावा, ही विनंती.

आपला,

(मो. गं. आरसेवाड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत: वरीलप्रमाणे.

F:\Sushilkumar\2022\82-2022\75 years of Independence.docx

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत
"हर घर झंडा" उपक्रम राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० जून, २०२२

वाचा :- १) केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाचे सादरीकरण दिनांक १२ एप्रिल, २०२२ व दिनांक २० मे, २०२२
२) भारतीय ध्वज संहिता २००५

**प्रस्तावना :-**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनात या स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक/ क्रांतिकारक/ स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात रहावी, या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी "आजादी का अमृत महोत्सव" अर्थात "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

२. केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाने "हर घर झंडा" या विषयावरील दि.१२.०४.२०२२ व दि. २०.०५.२०२२ च्या दोन स्वतंत्र सादरीकरणांद्वारे या कार्यक्रमाच्या आयोजनाच्या अनुषंगाने विविध निर्देश दिलेले आहेत. त्यामध्ये, (१) या उपक्रमांतर्गत सर्व शासकीय/ निमशासकीय/ खाजगी आस्थापना /सहकारी संस्था/ शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या इमारतींवर व नागरिकांनी स्वत:च्या घरावर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फूर्तीने करण्यासाठी सकारात्मक प्रभावी प्रसिद्धी मोहिम राबविण्यात यावी. (२) याबाबत सुक्ष्म नियोजनबद्ध कार्यक्रम आखण्यात येऊन उपरोक्त कालावधीत सदर उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात यावा. (३) या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व शासकीय/ निमशासकीय यंत्रणांनी प्रसार माध्यमातून जाणीव-जागृतीची मोहिम प्रभावीपणे राबवावी. (४) स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्रे, स्वस्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्व सामान्य नागरिकांशी निगडीत यंत्रणांचा वापर करुन सदर कार्यक्रम यशस्वी करावा, अशा सूचनांचा समावेश आहे. केंद्र शासनाच्या "हर घर झंडा" उपक्रम राबविण्याबाबतच्या दि. १२.०४.२०२२ च्या सादरीकरणांची प्रत सर्व मंत्रालयीन विभाग तसेच जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आली आहे. तसेच, दि.२०.०५.२०२२ च्या सादरीकरणाची प्रत सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आयुक्त, महानगरपालिका यांना यापूर्वीच पाठविण्यात आली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या सदरच्या मार्गदर्शक सूचना सर्व विभागांच्या पुनश्च: निदर्शनास आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या गौरवशाली पर्वानिमित्त दिनांक १२ मार्च, २०२१ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत "आजादी का अमृत महोत्सव" या उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत केंद्र शासनाने कळविले आहे. त्यानुसार राज्यात सदर कालावधीमध्ये "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" साजरा करण्याबाबत शासन निर्णय/शासन पत्रांद्वारे यापूर्वीच वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाने जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात व देशभक्तीची जाज्वल भावना कायम स्वरुपी मनात राहावी व त्याचे संस्मरण व्हावे या उद्देशाने "आजादी का अमृत महोत्सव" अंतर्गत दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये देशभरात "हर घर झंडा" हा उपक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना एकत्रितरित्या खालीलप्रमाणे पुन्हा उद्धृत करण्यात येत आहेत :-

१) सर्व शासकीय / निमशासकीय यंत्रणांनी प्रसार माध्यमातून देशाभिमान व जाणीव-जागृतीची मोहिम प्रभावीपणे राबवावी.

२) दिनांक ११ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत प्रत्येक शासकीय/निमशासकीय व खाजगी आस्थापनांवर तसेच, प्रत्येक घर व इमारतींवर राष्ट्रध्वज उभारणेसाठी नागरीकांना प्रोत्साहीत करावे.

३) नागरिकांनी राष्ट्रध्वज स्वत: विकत घेऊन उभारण्यासाठी त्यांना प्रेरीत करावे.

४) सदर राष्ट्रध्वज उभारणीसाठी जास्तीत जास्त प्रसिद्धी करावी. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करण्यात यावा.

५) केंद्रिय गृह विभाग यांच्या दिनांक ३० डिसेंबर २०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये भारतीय ध्वज संहिता २००२ भाग-१ मधील परिच्छेद १.२ मधील राष्ट्रध्वज हे "<u>**हाताने कातलेल्या किंवा विणलेल्या**</u> लोकर/सुत/सिल्क/खादी कापडापासून बनविलेला असेल", या तरतूदीमध्ये बदल करण्यात आला असून सदर बदलानुसार राष्ट्रध्वज हे हाताने कातलेल्या आणि हाताने विणलेल्या <u>**किंवा मशीनद्वारे**</u> तयार केलेल्या सुत / <u>**पॉलिस्टर/**</u> लोकर/ सिल्क/खादी पासून बनविलेल्या कापडाचे असावेत असा उल्लेख केला आहे. या बदललेल्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेल्या राष्ट्रध्वजाचा वापर या प्रयोजनासाठी करता येईल.

६) संगीतातूनही राष्ट्रध्वजाबाबत वेगवेगळ्या पद्धतीने सादरीकरण करता येईल.

७) "हर घर झंडा" या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी करावी.

८) या उपक्रमामध्ये राज्य / देशातील / परदेशातील सहभागी होणाऱ्या व्यक्तींची नोंद घ्यावी.

९) राष्ट्रध्वज मुबलक उपलब्ध होणेबाबत खात्री संबंधित यंत्रणांनी करावी.

१०) ऑनलाईन व ऑफलाईन राष्ट्रध्वज विक्री केंद्र राज्याने उपलब्ध करुन द्यावे

११) भारतीय ध्वज संहितेचे पालन व्हावे व जाणते-अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अपमान होऊ नये, याची दक्षता घेण्याबाबत नागरिकांमध्ये जाणीव-जागृती करावी.

१२) "हर घर झंडा" या उपक्रमांतर्गत कार्यक्रमाची छायाचित्रे, चित्रफिती, ध्वनीमुद्रण इ. केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाच्या amritmahotsav.nic.in या संकेत स्थळावर अपलोड करावे.

१३) नागरिकांमध्ये या उपक्रमाबाबत रुची निर्माण करण्यासाठी वेबसाईट, ई-कॉमर्स तसेच राष्ट्रध्वज भेट देणे अशा माध्यमांचा आधार घेण्यात यावा.

१४) स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस यंत्रणा, शाळा व महाविद्यालये, परिवहन, आरोग्य केंद्रे, स्वस्त भाव धान्य दुकाने, सहकारी संस्था अशा सर्व सामान्य नागरीकांशी निगडीत यंत्रणांचा वापर करुन सदर कार्यक्रम यशस्वी करण्यात यावा. याबाबतचा मार्गदर्शक कृती आराखडा सोबत परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविण्यात आला आहे.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२२०६२०१८१९२१८२२३ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**सोबत - परिशिष्ट - अ**

VILAS RAMRAO THORAT

**( विलास रा. थोरात )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) / मा. राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व पोलीस आयुक्त
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११. सर्व आयुक्त, महानगर पालिका
१२. सर्व मुख्य अधिकारी, नगर पालिका / नगर पंचायत
१३. सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी
१४. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखाली सर्व क्षेत्रिय अधिकारी
१५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१६. निवड नस्ती, सां.का.४.

शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ८२२२ /प्र.क्र. ११० (भाग-२)/सां.का.४

"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर झंडा"उपक्रम राबविण्याबाबत

## परिशिष्ट - अ

(अ) कृती आराखडा : ग्राम पंचायती

- सर्व ग्राम पंचायती - ग्रामीण प्रसारासाठी महत्वपूर्ण माध्यम
- संबंधित विभागांच्या स्तरावर आवश्यक असलेल्या ग्राम पंचायतींच्या प्रमुखांबरोबर संपर्क सत्रे / चर्चासत्रे यांचे आयोजन करावे.
- प्रत्येक गावात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करावी.
- बचत गटांचा सहभाग स्थानिक : शिलाई काम करणाऱ्या गटांद्वारे ध्वजांची शिलाई / निर्मिती करता येईल.
- विक्री / वितरण केंद्र म्हणून ग्रामपंचायत कार्यालयांचा उपयोग करुन घ्यावा.
- ग्राम पंचायतींद्वारे ध्वजांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करता येईल. सदर खरेदी स्थानिक घरांच्या संख्येवर आधारीत असावी.
- सर्व शासकीय इमारती / संस्थांवर ध्वजारोहण करावे.
- स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे.

(आ) कृती आराखडा : आरोग्य केंद्रे, रुग्णालये + ANM

- आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामुदायिक आरोग्य केंद्रे, उपविभागीय रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा या उपक्रमात महत्त्वपूर्ण सहभाग अपेक्षित आहे.
- संदेश वहन साहित्य - प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इ. स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत.
- प्रसुतिगृहातील सहाय्यक परिचारिकांना तिरंग्याची माहिती असलेल्या पुस्तिका (फ्लिप बुक्स) यांचे वाटप करावे.
- लहान मुलांना रंग देण्यासाठी छापील आकृत्या, छापील कागद (कटआउट्स, प्रिंटआउट्स) उपलब्ध करुन द्यावेत.
- रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षामध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे, आजादी का अमृत महोत्सव इ. बाबतचे चित्रपट दाखवावेत.

(इ) कृती आराखडा : रास्त भाव धान्य दुकाने (वाजवी किंमतीची दुकाने)

- रास्त भाव दुकाने :- ध्वज वितरण विक्री केंद्र म्हणून काम पाहावे.
- या दुकानांमध्ये आणि त्याच्या सभोवताली पूर्व ध्वनीमुद्रित संदेश, सांगितिक जाहिराती (जिंगल), राष्ट्रध्वजावरील माहिती माईकवर प्रसारित करावी.

**(ई) कृती आराखडा: शाळा आणि महाविद्यालये**

- शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्यामार्फत जाणीव-जागृती करणे. सदर योजनेचा प्रचार, प्रसार करण्यासाठी या माध्यमाचा वापर करावा.
- राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने / शिबीरे / चर्चासत्र इ. चे आयोजन करावे.
- #hargharjhanda या हॅशटॅगखाली समाज माध्यमांवर छायाचित्रे प्रसारित करावीत. राज्य/जिल्हा/शाळेचा उल्लेख करुन सोशल मीडियावर फोटो शेअर करावेत.
- पालकांचा सहभाग :- सर्व पालकांना सहभागी होण्यासाठी विशेष दैनंदिन सूचना पत्रे, पत्रके वितरीत करावीत.
- पालक शिक्षक सभा :- हर घर झंडा विषयी माहिती देण्यासाठी पालक शिक्षक सभांचे आयोजन करावे.

**(उ) कृती आराखडा : पोलीस**

- पोलीस महासंचालकांद्वारे हर घर झंडा या कार्यक्रमाबाबत विशेष बैठकांचे आयोजन करावे.
- विशेष तिरंगा मानवंदना संचलने आयोजित करावीत.
- हर घर झंडा या कार्यक्रमाविषयी प्रचार, प्रसार व जागरुकतेसाठी प्रचार साहित्य, पत्रिका व इतर साहित्य वितरीत करावे.
- पथनाट्यांद्वारे तिरंग्याची आण-बाण-शान या संकल्पनेचा प्रसार करण्यात यावा.
- पोलिस स्टेशन परिसरात - फलक, प्रसिध्दीपत्रके, उभे फलक (स्टँडी) लावणे व ध्वजारोहण करणे.
- पोलिस वसाहतींमध्ये राष्ट्रध्वजाची विक्री व वितरण केंद्रे निर्माण करण्याची विशेष मोहीम घ्यावी.
- सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वसाहतींमध्ये /घरी ध्वजारोहण करावे.
- प्रत्येक पोलीस तपासणी नाक्यावर तिरंगा ध्वजाची प्रसिध्दीपत्रके लावावी.

**(ऊ) कृती आराखडा : परिवहन सुविधा**

- राज्य परिवहनच्या बसेस "हर घर झंडा" याच्या संदेशाने रंगविल्या जाव्यात.
- पथकर व तपासणी नाके यांचे माध्यमातून हर घर झंडा या कार्यक्रमाचा प्रचार, प्रसार व जागरुकता निमार्ण करण्यासाठी माहिती पुस्तिका, प्रसिध्दी पत्रके इ. वितरित करणे.
- अंतरसंपर्क (इंटरकॉम) आणि ध्वनीचित्रमुद्रण (व्हिडिओ) प्रणालीद्वारे राज्यांतर्गत प्रवासी बसेसमध्ये - सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित ध्वजगीत वाजविणे, ध्वज संबंधित चित्रफित दाखविणे.

**(ए) कृती आराखडा : - प्रसार माध्यमे संकेतस्थळ, भिंतीचित्रे इ.**

- सर्व राज्य सरकारच्या संकेतस्थळांवर अमृत महोत्सव संकेतस्थळ (amritmahotsav.nic.in) हर घर झंड्याचा दुवा जोडावा.
- राज्य आणि जिल्हा स्तरावरील कृती आराखड्याबद्दल प्रसार माध्यमांना विशेष माहिती देणे. याअंतर्गत -
- १ जूनपासून दररोज विशेष बातमीपत्र सुरु करण्यासाठी दुरदर्शनचा, आकाशवाणीचा वापर करावा.
- स्थानिक प्रसिध्दी अधिकाऱ्यांनी सर्व कार्यक्रमांचे योग्य वार्तांकन करावे व त्यावर प्रकाशझोत टाकावा.
- ध्वज निर्मिती, वितरण, देशभक्ती यांच्याशी संबंधित असलेल्या स्वारस्यपूर्ण कथा निर्माण कराव्यात.
- सर्व सार्वजनिक बदलीच्या ठिकाणी भिंतीचित्रे (वॉल पेंटिंग्ज) निर्माण करावीत.

**(ऐ) कृती आराखडा : महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत**

- सर्व महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत - नागरी भागातील प्रसारासाठी महत्त्वपूर्ण माध्यम
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत यांच्या प्रशासकीय प्रमुखांनी संबंधित वॉर्डच्या अधिकाऱ्यांसमवेत समन्वय करुन संपर्क सत्रे / चर्चासत्रे याचे आयोजन करावे.
- प्रत्येक वॉर्डात ध्वज वितरण आणि विक्री केंद्राची निश्चिती करावी.
- बचत गटांचा सहभाग : स्थानिक शिलाई काम करणाऱ्या गटांद्वारे ध्वजांची शिलाई / निर्मिती करता येईल.
- विक्री / वितरण केंद्र म्हणून महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत कार्यालयांचा उपयोग करुन घ्यावा.
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत या आस्थापनांना ध्वजांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करता येईल. सदर खरेदी स्थानिक घरांच्या संख्येवर आधारीत असावी.
- सर्व प्रशासकीय इमारती / संस्थांवर ध्वजारोहण करावे.
- स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन घ्यावे.
- संदेश वहन साहित्य - प्रसिध्दी पत्रके, उभे फलक, बॅनर्स इ. स्थानिक भाषेत ठळकपणे प्रदर्शित करावेत.
- महानगर पालिका / नगरपालिकांच्या रुग्णालयातील प्रतिक्षा कक्षांमध्ये डिजिटल पडदे लावावेत, ध्वज आणि कार्यक्रम संबंधित माहिती प्रदर्शित करावी, तिरंगा ध्वजगीत लावावे, आजादी का अमृत महोत्सव इ. बाबतचे चित्रपट दाखवावेत.
- राष्ट्रध्वजाला समर्पित विशेष संमेलने / शिबीरे / चर्चासत्र इ. चे आयोजन करावे.
- महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत वसाहतींमध्ये राष्ट्रध्वजाची विक्री व वितरण केंद्रे निर्माण करण्याची विशेष मोहीम घ्यावी.

- जाहिरात फलक, बॅनर, फ्लिप बुक्स, सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित इ. चे नमुने

**(ओ) केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून खालील स्वरुपाचे सहाय्य उपलब्ध केले जाईल.**

- आजादी का अमृत महोत्सव (amritmahotsav.nic.in) या संकेतस्थळावर हर घर झंडा कॉर्नर
- अनुवाद करण्यासाठी व प्रसार व प्रचार करण्यासाठी पुरविलेली माहिती व संप्रेक्षण साहित्य डाऊनलोड कराव्यात.
- जाहिरात फलक, बॅनर, फ्लिप बुक्स, सांगितिक जाहिराती (जिंगल्स), ध्वनीमुद्रित इ. चे नमुने
- ध्वजगीत व ध्वनिचित्रफित पुरविणे.

*-*-*-*-*-*-*